# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १३२ वा शुक्रवार दि.१३ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


## मध्यप्रदेशातील आदिवासींवर सर्वाधिक अत्याचार : प्रियंका गांधी



इंदूर : मध्य प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणूक जाहीर झाल्या आहेत. सगळ्याच राजकीय पक्षांनी निवडणूक प्रचाराला सुरवात केली आहे. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी गुरुवारी मध्य प्रदेशच्या मांडला येथे काँग्रेसच्या 'जनआक्रोश यात्रे'ला संबोधित केले. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. त्या म्हणाल्या की, मध्य प्रदेशचे भाजप सरकार गेल्या २२५ महिन्यांपासून सत्तेत आहे. या कार्यकाळात तब्बल २५० घोटाळे झाले आहेत. मध्यप्रदेशातील आदिवासींवर सर्वाधिक अत्याचार होत आहे. राज्यात आदिवासींवर होत असलेल्या अत्याचाराची तुलनाच करू शकत नाही. भाजप सरकारचे लोक लुटण्यात व्यस्त आहेत.प्रियंका गांधी म्हणाल्या की, राज्यातील दीड लाख महिला आणि मुली बेपत्ता झाल्या आहेत. राज्यात दररोज १७ बलात्काराच्या घटना घडत आहेत. आदिवासींवर होत असलेल्या अत्याचाराची तुलना होऊ शकत नाही. लोकांना रोजगार मिळत नाही आणि भाजप सरकारचे लोक लुटण्यात व्यस्त आहेत. धर्म आणि जातीची चर्चा केली जात आहे आणि जनतेच्या भावना त्या मुद्यांशी जोडल्या जात आहेत. भाजप मध्य प्रदेशात २२५ महिन्यांपासून सत्तेत आहे, २५० घोटाळे झाले आहेत. भाजप सरकार १८ वर्षांपासून सत्तेत असून २२ हजार घोषणा केल्या आहेत, असे त्या म्हणाल्या. प्रियंका गांधी म्हणाल्या की, जातीनिहाय जनगणनेत ओबीसी, दलित, एससी आणि एसटीचे किती लोक आहेत हे दिसून येईल. केंद्रातील भाजप सरकारला याबाबत बोलायचे नाही. आम्ही म्हणतोय देशात जनगणना करा, मगच कळेल त्यांना न्याय मिळतो की नाही. तसेच मध्य प्रदेशात अनुशेष पदांवर तात्काळ भरती, शेतकऱ्यांचे कर्ज माफ, १०० रुपयांत १०० युनिट वीज, जुनी पेन्शन योजना, गॅस सिलिंडर ५०० रुपयांना, महिलांच्या खात्यात १५०० रुपये आणि ओबीसी आरक्षण २७ टाक्यांपर्यंत राहील, असे त्या म्हणाल्या.

## पंतप्रधान मोदींनी घेतले कैलासाचे दर्शन

डेहराडून : पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी उत्तराखंड दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदींनी सर्वप्रथम पिथौरागढ जिल्ह्यातील जोलिंगकांग येथील आदि कैलास पर्वत पाहिला. यावेळी पंतप्रधान मोदींनी कैलासाचे दर्शन घेतले. पंतप्रधान मोदी हे देशाचे पहिले पंतप्रधान आहेत ज्यांनी चीनच्या सीमेवर असलेला आदि कैलास इतक्या जवळून पहिला. यासोबतच पंतप्रधान मोदी उत्तराखंडला सुमारे ४२०० कोटी रुपयांचे विकास प्रकल्पही भेट देणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी उत्तराखंडच्या



एक दिवसीय दौऱ्यावर आले आहेत, जिथे त्यांनी भगवान शिव आणि कैलास शिखराचे दर्शन घेतले आणि पार्वती कुंड येथे जाऊन प्रार्थना केली. पिथौरागढच्या जिल्हा दंडाधिकारी रीना जोशी यांनी सांगितले की, पंतप्रधान दिवसभराच्या दौऱ्यात सीमावर्ती गुंजी गावालाही भेट देतील. त्यांनी सांगितले की, या व्यतिरिक्त पंतप्रधान अल्मोडा येथील भगवान शिवाचे आणखी एक प्रसिद्ध निवासस्थान जागेश्वरलाही भेट देणार आहेत.

## गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणारा गृहमंत्री सुप्रियाताईंना आवडणार नाहीच




मुंबई : '१०० कोटी वसुली करून देणारा गृहमंत्रीच राष्ट्रवादीला (शरद पवार) आवडत असेल तर त्याला महाराष्ट्र तरी काय करणार? गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणारा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सुप्रियाताईंना आवडणार नाहीच असे चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.दरम्यान, राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत असतात. अशातच राष्ट्रवादीच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी फडणवीसांवर केलेल्या टीकेवर भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ यांनी तिखट शब्दांमध्ये प्रत्युत्तर दिले आहे. चित्रा वाघ म्हणाल्या, राज्याच्या मोठ्या ताई सुप्रियाताईंना १०० कोटी वसुली करून देणारा गृहमंत्रीच आवडत असेल तर त्याला महाराष्ट्र तरी काय करणार? गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणारा गृहमंत्री तुम्हाला आवडणार नाहीच. महिलांच्या बेपत्ता प्रकरणात संपूर्ण देशातील आणि अगदी महाविकास आघाडी काळातील परिस्थिती सभागृहात सांगून तुमचे समाधान होणार नाही,ससून प्रकरणात ९ पोलिस निलंबित झाले, पण तुम्हाला ते आवडले नसेल कारणहेरंब कुलकर्णी हल्लाप्रकरणी आरोपींना बेड्या ठोकल्या, पण तेही तुम्हाला आवडले नसेल.. कारण, तुम्हाला फक्त १०० कोटींत रस आहे. मग ते एकरी वांग्यातून असो की वसुली करून देणारा गृहमंत्री..आरोपींना लोणावळ्यात सरकारी इतमामात पळून जायला मदत करणारा गृहमंत्री हवाय? की उद्योगपतींच्या घरासमोर स्फोटके ठेवायला मदत करणारा, अशा पोलिसांना सेवेत घेणारा गृहमंत्री? तुमची चॉईसच वेगळी आहे, त्याला महाराष्ट्र करणार तरी काय महाराष्ट्राच्या मोठ्या ताई? सुप्रिया सुळेंची टीका काय होती? अजितदादा राज्याचे मुख्यमंत्री झाल्यास मला आनंदच होईल, ते मुख्यमंत्री झाल्यास पहिला हार त्यांना मी घालणार. त्यासाठी देवेंद्र फडणवीसांनी ही संधी मला द्यावी असे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले होते. अजित पवारांनी राज्याच्या सुरक्षेसाठी देवेंद्र फडणवीस यांना गृहमंत्रिपद देऊ नये, असेही पुढे त्या म्हणाल्या होत्या. त्याला आता चित्रा वाघ यांनी उत्तर दिले आहे.

## सुधीर (दादा) देशमुख यांनी चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख यांना वाढदिवसाच्या निमित्ताने भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.



लातूर :- विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर (दादा) देशमुख यांनी त्यांची बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## आयआयटीमधील एक टक्का विद्यार्थीही इस्त्रोमध्ये येत नाहीत : इस्त्रो प्रमुख



बंगळुरू : जगातील प्रमुख अवकाश संशोधन संस्थांमध्ये इस्त्रोची गणना होते. कित्येक कठीण स्पेस मिशन यशस्वीपणे पार पाडण्याचा विक्रम इस्त्रोच्या नावावर आहे. मात्र असे असतानाही आयआयटीमधील विद्यार्थी इस्त्रोमध्ये काम करण्यास तयार होत नाहीत. भारताच्या या अवकाश संशोधन संस्थेमध्ये आयआयटीमधील एक टक्का विद्यार्थी देखील येत नसल्याचे समोर आले आहे. इस्त्रोचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी ही माहिती दिली आहे. भारतातील टॉप इंजिनिअर्स हे आयआयटीमधून बाहेर पडतात. मात्र, त्यांना इस्त्रोमध्ये काम करण्यात रस नसल्याचे दिसून येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, इस्त्रोमध्ये इंजिनिअर्सचा सुरुवातीचा पगार साधारणपणे ५६,१०० रुपये प्रति महिना एवढा आहे. तर इस्त्रोचे चेअरमन एस. सोमनाथ यांचा पगार २.५ लाख रुपये महिना एवढा आहे. आयआयटीमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना सरासरी मिळणारा पगार हा इस्त्रोच्या चेअरमन यांच्या पगाराएवढा आहे. त्यामुळेच आयआयटीमधून बाहेर पडणारे विद्यार्थी इस्त्रोऐवजी दुसऱ्या देशातील एखादी मोठा पगार देणारी कंपनी निवडत आहेत.एस. सोमनाथ यांनी सांगितले की, अवकाश संशोधन हे महत्त्वाचे क्षेत्र आहे असा विचार करणारे लोक इस्त्रोमध्ये येतात. मात्र, असा विचार करणारे एक टक्क्याहून कमी विद्यार्थी आहेत. याचे सगळ्यात मोठे कारण पगार हे आहे. त्यांनी सांगितले की, इस्त्रोची टीम एकदा कॅम्पस प्लेसमेंटसाठी आयआयटीमध्ये गेली होती. त्यावेळी इस्त्रोमधील संधी आणि कामाची पद्धत विद्यार्थ्यांनी ऐकून घेतली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीदिनी संसदेत गोवा व महाराष्ट्र या दोन राज्याचे प्रतिनिधीत्व म्हणून महात्मा गांधीवर व्याख्यान करणारी कु. विधी सुभाष पळसापुरे हिचे स्वागत करताना जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस तथा दैनिक महावृत्त चे संपादक अशोक हनवते व कोषाध्यक्ष अरुण कांबळे दिसत आहेत.

## इस्त्राईलमध्ये अडकलेल्या भारतीयांसाठी ऑपरेशन अजय सुरू!

नवी दिल्ली : इस्त्राईल आणि हमास यांच्यात युद्ध सुरूच आहे. दोन्ही बाजूंनी आतापर्यंत तब्बल २१०० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तसेच अनेक भारतीयही इस्त्राईलमध्ये अडकले आहेत. एका वृत्तानुसार, २० हजारांहून अधिक भारतीय इस्त्राईलमध्ये आहेत. इस्त्राईलमध्ये अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासाठी भारताकडून आजपासून ऑपरेशन अजय सुरू करण्यात आले आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी ही माहिती दिली आहे.परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले की, इस्त्राईलमधून भारतात येऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी ऑपरेशन अजय सुरू करण्यात येत आहे. विशेष चार्टर विमाने आणि इतर व्यवस्था करण्यात आली आहे. परदेशात राहणाऱ्या आमच्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि कल्याणासाठी आम्ही पूर्णपणे वचनबद्ध आहोत. तसेच इस्त्रायलमधील भारतीय दूतावासाने सांगितले की, ज्या भारतीय नागरिकांनी स्वतःची नोंदणी केली आहे, त्यांना स्पेशल फ्लाइटसाठी मेल पाठवण्यात आला आहे. त्यानंतरच्या फ्लाइटसाठी इतर



नोंदणीकर्त्यांना संदेश पाठवला जाईल. तसेच परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी बुधवारी सांगितले की, सध्याची परिस्थिती पाहता भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी आपत्कालीन क्रमांक जारी करण्यात आला आहे.

## व्हटी येथील अनुसूचित जातीच्या महिलेवर बलात्कार करणाऱ्या नराधमास फाशी द्या -फकिरा ब्रिग्रेडची मागणी





लातूर (प्रतिनिधी) व्हटी ता.रेणापूर जिल्हा लातूर येथील अनुसूचित जातीच्या अपंग महिलेवर बलात्कार करणाऱ्या नराधमास व्हटी गावच्या चौकात फाशी देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री , महिला आयोगाच्या अध्यक्षा यांना फकिरा ब्रिगेडच्या वतीने निवेदनाव्दारे करण्यात आली आहे

किनगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या व्हटी या गावात एक अनुसूचित जातीची अपंग महिला गावातील एका सवर्णांच्या घरी घरकाम करण्यासाठी जात होती. गरीबी, आर्थिक दारिद्रय याचा गैरफायदा घेऊन त्या घरातील पन्नास ते पंचावन्न वर्षे वय असलेल्या नराधमांने या महिलेवर पासवी बलात्कार केला.या घटनेचा फकिरा ब्रिग्रेड या सामाजिक संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.हा नराधम गेल्या अनेक महिन्यांपासून या महिलेवर बलात्कार करीत होता या पासवी कृत्यामुळे त्या मुलीला दिवस गेले बलात्का-याने ही घटना कुणाला सांगितली तर तुला आणि तुझ्या कुटुंबातील व्यक्तींना ठार मारीन अशी धमकी दिली त्यामुळे या पिडीतेने ही घटना घरी कोणालाही सांगितली नाही,जेव्हा या पिडीतेला लातूरच्या शासकीय दवाखान्यात घेऊन गेले तिथे तिची सोनोग्राफी केली तेव्हा ती सात महिन्याची गर्भवती असल्याचे आढळून आले असे पशूसारखे कृत्य करणाऱ्या गावगुंडांला तात्काळ अटक करून गावच्या चौकात फाशी देण्यात यावी अशी मागणी फकिरा ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.या निवेदनावर फकिरा ब्रिग्रेडचे राज्य कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर, जिल्हाध्यक्ष सचिन शिंदे, महिला अध्यक्ष निर्मला नवगिरे, जिल्हा सचिव पांडुरंग मस्के, जिल्हा कार्याध्यक्ष संजय विरूळे, रेणापूर तालुका अध्यक्ष गोविंद धबडगे, सुरेकांत कदम,बाळू पटनुरे, बाळासाहेब वाघमारे, संतोष पटनुरे, सुदर्शन शिंदे, मुकेश लोंढे, नाना लोंढे, अंकुश कांबळे, सतीश शिंदे,गहिनीनाथ मस्के, ऋषी भडंगे आदी कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत

## अजित पवार मुख्यमंत्री होणार हे स्वप्नच.



अकोला : अजित पवार मुख्यमंत्री होणार हे स्वप्न आहे, ते प्रत्यक्षात घडणार नाही, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बोचरा वार केला. शरद पवार आज अकोला दौ-यावर आहेत. यावेळी त्यांनी सहकार मेळाव्याला हजेरी लावली. या मेळाव्यानंतर त्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. प्रकाश आंबेडकर यांना इंडिया आघाडीत घेण्यास आम्ही सकारात्मक आहोत. त्याबाबत लवकरच निर्णय घेणार असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. जर अजित पवार मुख्यमंत्री झाले तर मी स्वत: त्यांना हार घालेन असे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या. त्याबाबत शरद पवारांना विचारण्यात आले. त्यावर पवार म्हणाले, 'हे स्वप्न आहे, ते प्रत्यक्षात घडणार नाही.'यावेळी शरद पवार यांनी प्रकाश आंबेडकरांच्या इंडिया आघाडीतील समावेशाबाबत भाष्य केले. प्रकाश आंबेडकरांनी यापूर्वी काय झालं याचा विचार न करता पुढचा विचार करावा की त्यांना आघाडीत यायचं आहे का? प्रकाश आंबेडकर इंडिया आघाडीच्या पुढील बैठकीला असतील की नाही ते आघाडी आणि प्रकाश आंबेडकर ठरवतील. आमचा आग्रह हाच असणार आहे की जे तीन पक्ष एकत्र आलो आहोत त्यांचंच सरकार येईल. प्रकाश आंबेडकरांना इंडिया आघाडीत घेण्यास आम्ही सकारात्मक आहोत. त्याबाबत लवकरच निर्णय घेणार, असे शरद पवार म्हणाले.जनमानसात आम्हाला मिळणारा प्रतिसाद मतांत परिवर्तित झाला तर आमची सत्ता येईल. सुप्रिया सुळेंना पक्षाध्यक्ष करा हा छगन भुजबळांचा प्रस्ताव होता. मी उद्योगपती गौतम अदाणी यांच्या औषधाच्या कारखान्याच्या उद्घाटनाला गेलो. सार्वजनिक कार्यक्रमात जावे लागते.अजित पवार मुख्यमंत्री होणार हे स्वप्न. देशात अनेक भागात भाजप नाही. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे,आमची नव्हे.पक्षात फूट आम्ही पाडली नाही आमची भूमिका स्वच्छ आहे. पक्षात फूट आम्ही पाडली नाही. आम्हाला खात्री आहे की आम्हाला आमचा पक्ष म्हणून आमचे म्हणणे मांडण्याची संधी मिळेल. उद्या कुणी युनायटेड नेशन्सचा अध्यक्ष म्हणून पत्र लिहील. आमची भूमिका स्पष्ट आहे. पक्षात फूट आम्ही पाडली नाही, असे शरद पवार म्हणाले

## संपादकीय....

# मोदींमुळेच मतभेद सांधले जात आहेत

गुजरातमध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत राजकारण होऊच नये म्हणून नरेंद्र मोदींनी केलेला 'समरस पंचायती'चा प्रयोग असो की ईशान्येकडील राज्यांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी उचल-लेली अनेक पावले असोत गेली २२ वर्षे मोदींमुळेच मतभेद सांधले जात आहेत हसमुख अढ़िया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासंदर्भात ७ ऑक्टोबर हा दिवस खास आहे. प्रथम मुख्यमंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून त्यांनी सार्वजनिक सेवेत यंदाच्या ७ ऑक्टोबर रोजी २२ वर्षे पूर्ण केली. सरकारप्रमुख पदावरच्या इतक्या समृद्ध अनुभवाचा अभिमान बाळगू शकणारे भारतात सोडाच, जागतिक स्तरावरही क्वचितच कोणी असतील. गेल्या काही वर्षांत नरेंद्र मोदी आणि त्यांचे नेतृत्वगुण, त्यांचे कौशल्य आणि त्यांच्या प्रशासकीय कुशाग्रतेबद्दल बरेच काही लिहिले गेले आहे. परंतु एक गुण आहे ज्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही – मोदी हे सहमतीची बांधणी करणारे नेते आहेत. भारताच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत नुकतीच पार पडलेली 'जी-२०' शिखर परिषद या संदर्भात उल्लेखनीय आहे. या शिखर परिषदेमुळे जगभरच्या २० महत्त्वाच्या देशांतील मतभेद कमी होतील की वाढतील याकडे जग उत्सुकतेने पाहात होते प्रत्यक्षात नवी दिल्लीतील ही शिखर परिषद सर्वांना आनंदाश्चर्याचा धक्का देणारी ठरली, कारण जागतिक तणाव कमी करण्याच्या, जागतिक प्राधान्यक्रमांची दृष्टी विस्तृत करण्याच्या आणि 'जी-२०' समूहाचाही विस्तार करून विकसनशील शांतताप्रेमी ('ग्लोबल साऊथ') देशांना अधिक प्रतिनिधित्व देण्याच्या दृढ निर्णयाने- तशा जाहीरनाम्याने- या बैठकीची सांगता झाली.सर्वांना एकत्र आणून, एकमत घडवून आणण्याच्या या पुढाकारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आगळी छाप होती. 'जी-२०'चे नेतृत्व कुशलतेने चाल-वताना 'ग्लोबल साऊथ'चा आवाज वाढवत नेऊन मोदी यांनी, अविश्वासाच्या दऱ्या सांधणारे परस्पर-विश्वासाचे पूल जणू उभारले. भारताच्या नेतृत्वाखाली पूर्व आणि पश्चिम एकत्र आले आणि विकसित देशांनी विकसनशील देशांचे- म्हणजे 'ग्लोबल नॉर्थ'ने 'ग्लोबल साऊथ'चे- म्हणणे संवेदनक्षमता दाखवून ऐकून घेतले, हे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या इतिहासात एक अद्वितीय पाऊल ठरते.

शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, भारत-मध्यपूर्व-युरोप कॉरिडॉर या मार्गासंदर्भातील कराराला मूर्तरूप आले. त्याला केवळ त्याच्या भागधारकांकडूनच नव्हे तर संपूर्ण 'जी-सेव्हन' कन्सॉर्शियमकडून समर्थन मिळाले. वास्तविक असे एकमत होणे अत्यंत जिकिरीचे होते, भारताबद्दलही काहींना शंका होत्या; पण अशी नाजूक परिस्थिती भारतीय नेतृत्वाने कौशल्याने हाताळली. या कौशल्याच्या परिणामी, जागतिक नेत्यांमध्ये एकतेची भावना वृद्धिंगत झाल्याचे दिसले.जगभरातील अनेकांना हा दृष्टिकोन अनपेक्षित वाटला असेल. अर्थात, पंतप्रधान मोदींचे जीवन आणि जीवनातील तत्त्वांशी परिचित असलेल्या साऱ्यांना मोदींच्या या वैशिष्ट्यपूर्ण शैलीची ओळख आधीपासूनच आहे. विशेषत: तीव्र मतभेद असताना सर्वांना सोबत घेऊन एकमत घडवणे, हेच तर मोदी यांचे वैशिष्ट्य.जेव्हा त्यांनी राष्ट्रीय नेतृत्व स्वीकारले तेव्हा जरी राष्ट्रीय पातळीवरचा अनुभव नसला तरी, सर्व संबंधितांना एकत्र आणण्याचे आणि खोलवर रुजलेल्या समस्यांवर उपाय शोधण्याच्या उत्तम आदर्शांची भक्कम शिदोरी त्यांच्यासह होती. यातील अनेक समस्या संवादातून सोडवता आल्या असत्या, परंतु निव्वळ (इतरांच्या) राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे काही प्रश्न अनिर्णित राहिले.त्यांची पहिलीच बांगलादेश भेट हा त्याचा पुरावा आहे. भारत आणि बांगलादेशने भू-सीमा करारावर स्वाक्षरी करावी, असा विचार अनेक वर्षांपासून केला जात होता, परंतु दोन्ही देशांची सरकारे टाळाटाळ करत होती. द्विपक्षीय संबंधांमध्ये चार दशकांहून अधिक काळ बाधा आणणाऱ्या, दीर्घकाळ रखडलेल्या भू-सीमा निश्चिती कराराचे काम पंतप्रधान मोदींनी बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी चर्चेद्वारे तडीस नेले. या कराराला मान्यता देण्यासाठी भारतातील विविध राजकीय मतभेदांना एकत्र आणणे ही काही छोटी उपलब्धी नव्हती. लोकसभेत '१०० वी घटनादुरुस्ती' म्हणून या कराराला मान्यता देण्याचा प्रस्ताव मांडून पंतप्रधान मोदींनी, व्यापक भल्यासाठी राजकीय मतभेद ओलांडण्याची क्षमता ठळक केली. बांगलादेशचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री ए. एच. महमूद अली यांनी भारत-बांगलादेश संबंधांना गती देण्याचे श्रेय पंतप्रधान मोदींना दिले.पंतप्रधान मोदींच्या दृष्टिकोनाचे आणखी एक प्रमुख उदाहरण भारताच्या महत्त्वपूर्ण कर दुरुस्ती विधेयकातून दिसून आले. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आणण्यासाठी एकतर्फी निर्णय घेण्याऐवजी, मोदीजींनी सहयोगी भावनेला चालना दिली, जीएसटीच्या रूपरेषेला आकार देण्यामध्ये प्रत्येक राज्याचा सक्रिय आवाज असल्याचे मोदींनी सुनिश्चित केले. ही कित्येक वर्षे हुलकावण्या देणारी कर सुधारणा व्यापक सल्लामसलत आणि पंतप्रधानांच्या नेतृत्वामुळे, अगदी बिगर-भाजप राज्यांमध्येही विश्वास निर्माण करणाऱ्या सूक्ष्म प्रक्रियेद्वारे आकारास आली! आज जीएसटी महसुलाची वाढती, सकारात्मक वाटचाल ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या उलाढालीवर प्रकाश टाकतेच पण ते मुळात या सुधारणेचे यश आहे.ईशान्य भारतातील शांतता, समृद्धी जुन्या जखमा भरून काढण्याच्या पंतप्रधान मोदींच्या क्षमतेने ईशान्य भारतातील राज्यांमध्ये शांतता आणि समृद्धीचे नवे पर्व आणले आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २७ जानेवारी २०२० रोजी झालेल्या 'बोडो करारा'मुळे आसाममधील ५० वर्षांची अशांतता संपली. तर ३ जुलै २०१८ रोजी झालेल्या 'ब्रु-रिआंग करारा'ने त्रिपुरा राज्यातील ३७ हजार विस्थापित व्यक्तींचे पुनर्वसन केले.याच त्रिपुरा राज्यातील 'नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा (एनएलएफटी)'शी झालेल्या कराराने (१० ऑगस्ट २०१९) दीर्घकाळ चाललेल्या बंडखोरीला लगाम घातला. 'कार्बी आंगलाँग करार' ४ सप्टेंबर २०२१ रोजी झाला, त्यातून हिंसक संघटनेच्या एक हजाराहून अधिक सशस्त्र कार्यकर्त्यांनी हिंसेऐवजी शांततेचा पर्याय निवडल्यामुळे आसाम राज्याच्या वाटचालीत एक आश्वासक बदल घडवून आणला. २९ मार्च २०२२ रोजी झालेला 'आसाम-मेघालय आंतरराज्य सीमा करार' ही कदाचित सर्वात उल्लेखनीय कामगिरी होती. या करारामुळे, दोन राज्यांमधील प्रदीर्घ सीमा विवादांपैकी सुमारे ६५ टक्के भागाचा प्रश्न मिटला. हे सर्व करार (गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत झाले असले तरी) असमान पक्षांना एकत्र आणण्याचे मोदी यांचे कौशल्य दाखवून देण-रे आहेत.गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून मोदींच्या कार्यकाळाकडे मागे वळून पाहाताना, समाजातील दरी सांधण्यासाठी त्यांची कटिबद्धता अधिक स्पष्ट होते. मुख्यमंत्री असतानाच्या काळापासून त्यांनी ग्रामीण जीवनावर परिणाम करणाऱ्या, कुटुंबांमध्ये कटुता निर्माण करणाऱ्या आणि खेड्यांच्या विकासाला बाधा आणणाऱ्या मतभेद आणि मनभेदांना मिटवण्याच्या गरजेवर भर दिला. संघर्षाऐवजी सहमतीची बीजे पेरण्यासाठी त्यांनी सर्व महिलांच्या नेतृत्वाखालील 'समरस ग्रामपंचायती'ची संकल्पना आणली. ज्या ग्रामपंचायती एकमताने पंचायत नेते निवडू शकल्या, त्यांना आर्थिक प्रोत्साह-नही देण्यात आले.पंतप्रधान मोदी हे दीर्घकाळ सलगपणे सार्वजनिक पदावर आहेत, पण त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे या सर्व काळात त्यांच्याकडे एकमत निर्माण करण्याची वचनबद्धता आहे. जागतिक स्तरावरील शिखर परिषद असो किंवा आसपासच्या ग्रामपंचायतींचे संमेलन असो, विविध गटांना एकत्र आणण्यात पंतप्रधान मोदींची निपुणता नेहमीच लखलखीतपणे दिसून येते. याचे कारण प्रतिकूल परिस्थितीतही मोदीजींचे नेतृत्व हे सर्वसमावेशकतेला प्राधान्य देते, प्रत्येक आवाज ऐकला जातो, प्रत्येक चिंतेकडे लक्ष दिले जाते आणि खऱ्याखुऱ्या संवादातून एकमत तयार होते. ही गुणवत्ता केवळ लक्षणीय नाही तर आजच्या बहुआयामी जगात आवश्यक आहे. विशेषत: आजचे जग अनेक संघर्षांनी ग्रासले असताना, त्यामुळे अनेक आव्हानांना सामोरे जात असताना, मोदी मात्र भारताच्या 'वसुधैव कुटुंबकम्'च्या कालातीत भारतीय लोकाचाराचा मंत्र जगाला देत आहेत. या जागतिक विश्वव्यापी सहभावनेचे अग्रणी म्हणून देशाचे प्रधान सेवक नरेंद्र मोदी यांचा चेहरा दिसत आहे.

# प्रकल्पवादी वि. प्रक्रियावादी

वास्तविक खुद्द सिक्कीम राज्य सरकारच्या पाहणीने २०१२ साली केलेल्या अभ्यासांत हा धोका दाखवून दिला होता. हिमनद्यांतून वाहून येणाऱ्या पाण्याचे वाढते प्रमाण, धरणांची मजबुती आणि जलविद्युत प्रकल्पाचा अट्टहास यांचा विचार सिक्कीमच्या प्रलयानंतर तरी होणार की नाही?

सत्ताधीश दोन प्रकारचे असतात. त्यांचे वर्णन प्रकल्प-प्रेमी आणि दुसरे प्रक्रिया-स्नेही असे करता येईल. पहिल्या प्रकारातील मंडळीस भव्य पुतळे, महामार्ग, पूल इत्यादींच्या उभारणीत रस असतो तर दुसऱ्या वर्गातील सत्ताधीश असे नेत्रसुखद काही करण्यापेक्षा सामान्यांच्या आयुष्यात काही निश्चित बदल होईल अशा प्रकारचे सकारात्मक बदल प्रक्रियेद्वारे करीत असतात. यात प्रसिद्धी नसते. पण यातून गुंजभर का असेना व्यवस्थेत सकारात्मक बदल होतो आणि तो चिरस्थायी असतो. दूरसंचार सुधारणा, आर्थिक उदारीकरण, परमिट राज खालसा, रोजगार हमी योजना ही काही यांतील दुसऱ्या प्रकारची उदाहरणे. पहिल्या वर्गातील नमुने नमूद करण्याची गरज नाही. ते आसपास बरेच दिसतील. हा ऊहापोह आता करण्याचे कारण म्हणजे गतसप्ताहात सिक्कीमसारख्या मोहक आणि नाजूक राज्यात निसर्गाने घडविलेला उत्पात. गतसप्ताहाच्या अखेरीस पश्चिम आशियाई वाळवंटातील मानव-निर्मित हाहाकाराने सिक्कीममधील घटनांवर भाष्य मागे पडले. वर्तमानपत्रीय निकषांनुसार त्यास विलंब झाला तरीही ते करणे अगत्याचे कारण त्या राज्यात जे काही झाले ते काही सर्वसाधारण अतिवृष्टी आणि त्यानंतरची प्रलयसदृश परिस्थिती असे काही नव्हते. प्रकल्प-प्रेमी सत्ताधीशांनी प्रक्रियांकडे सरसकट दुर्लक्ष केले की काय होऊ शकते याचा तो मूर्तिमंत धडा होता. तो पहिला नव्हता आणि तो शेवटचाही असणार नाही. अशा धडय़ांतून आपण काही शिकत असतो असा काही भाबडेपणा न दाखवताही जे झाले ते काय आणि किती भयंकर होते, हे समजून घ्यायला हवे. सिक्कीम, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आदी राज्यांत हिमनद्यांच्या वितळण्याने तयार झालेले अनेक नैसर्गिक तलाव आहेत. अतिवृष्टी झाल्यास हे पाणी किती प्रमाणात वाहते याचे आतापर्यंतचे काही निकष आहेत. ते गेल्या आठवडय़ातील पावसाने धुळीस मिळवले. त्या वेळी झाले असे की वाढत्या तपमानाने वितळत्या बर्फाच्या पाण्याने ही तळी तुडुंब भरलेली असताना अतिमुसळधार वृष्टी झाली. यामुळे या तळय़ांचा बांध फुटला आणि पाणी ओसंडून वाहू लागले. यातील धक्कादायक बाब अशी की या तलावांची बांधफुटी लक्षात आल्यानंतरही संबंधित यंत्रणेने उतारावरील शहरे आदींस सतर्कतेचा इशारा दिला नाही. या हिमनद्यांच्या तलावांतून ओसंडून जाणारे पाणी इतके प्रचंड होते की ते आपल्या दोन काठांतून सामावून वाहवणे बिचाऱ्या तीस्ता नदीला जमले नाही. तोपर्यंत धोक्याच्या पातळीपेक्षा किती तरी खालून वाहणारे तिचे पात्र टम्म फुगले आणि ती वाटेत येईल त्यास उद्ध्वस्त करीत पुढे झेपावत राहिली. यात शहरे होती, महामार्गलगतचे काठ होते, १४ पूल होते आणि त्याहीपेक्षा अत्यंत आक्षेपार्ह भाग म्हणजे सुमारे १३ हजार कोटी रुपये खर्चून उभारलेला जलविद्युत प्रकल्पही होता. त्यानंतर झाले ते इतकेच की पाण्याच्या या प्रचंड रेटय़ाने अवघ्या १० सेकंदांत जलविद्युत प्रकल्पासाठी उभारण्यात आलेल्या धरणाची १८० फुटी भिंत जमीनदोस्त केली आणि वरून येणाऱ्या जलप्रपातात जलविद्युत प्रकल्प धरणाच्या पाण्याची भर पडली. अर्थातच या जलविद्युत प्रकल्पाचा शब्दश: चिखल झाला. जे झाले त्याच्या मुळाशी 'ग्लेशियल लेक आऊटबर्स्ट फ्लड' (जीएलओएफ) प्रवृत्ती असल्याचे सांगितले गेले.

यातील संतापजनक भाग असा की ही प्रवृत्ती या परिसरातील अनेक तलावांबाबत दिसून येते; सबब या परिसरात विकासकामे हाती घेण्यापूर्वी या धोक्याचाही विचार व्हायला हवा, असा इशारा या संदर्भात याआधी अनेकदा दिला गेला. त्याकडे सरकारी सवयीप्रमाणे दुर्लक्ष झाले आणि हा जलविद्युत प्रकल्प रेटला गेला. अलीकडे म्हणजे २०१५ साली पूर्ण झालेल्या या प्रकल्पाची पुन्हा माती झाली. यातील धक्कादायक बाब अशी की अशा जलविद्युत प्रकल्पांची निर्मिती करणाऱ्या 'नॅशनल हायड्रो-पॉवर कॉर्पोरेशन'कडून या परिसरात अशा प्रकारच्या एक नव्हे, दोन नव्हे, तीनही नव्हे तर तब्बल ४५ जलविद्युत प्रकल्पांची उभारणी हाती घेण्यात आली आहे. सिक्कीम आणि पश्चिम बंगालात उभारले जाणारे हे प्रकल्प तीस्ता नदीवरच आहेत, हे आणखी एक विशेष. वास्तविक गेल्या काही वर्षांत उत्तराखंड वा हिमाचलात जे काही घडले ते पाहता या महामंडळाने काही एक किमान शहाणपण दाखवत इतक्या नाजूक प्रदेशात इतक्या जलविद्युत प्रकल्पांची उभारणी हाती घेणे टाळायला हवे होते. पण 'वरच्यांच्या' काही तरी भव्य करून दाखवण्याच्या दबावास सरकारी महामंडळांचे बाबू बळी पडतात आणि असले काही अगोचर उद्योग करू लागतात. ते कसे अंगाशी येतात हे या महामंडळांतील दीडशहाण्यांना सिक्कीमचा प्रलय दाखवून देतो. हिमनद्या वितळण्याचे प्रमाण वाढणार, त्यामुळे नद्या आधीच फुगलेल्या असणार आणि त्यात जरा जरी जास्त पाऊस पडला की हाहाकार होणार हे लक्षात घेण्यास फार काही विद्वत्तेची गरज नाही. वास्तविक खुद्द सिक्कीम राज्य सरकारच्या पाहणीने २०१२ साली केलेल्या अभ्यासांत हा धोका दाखवून दिला होता. सिक्कीममधील काही हिमतलावांचा आकार वाढत असल्याचे या पाहणीत नमूद करण्यात आले होते. उंचीवरून वितळत्या हिमनद्यांतून वाहून येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढत असल्याचा हा इशारा. त्यानंतर पुन्हा २०२१ साली केलेल्या पाहणीतून एका विशिष्ट तलावास हा अतिवृष्टीनंतर बांधफुटीचा धोका आहे, असेही स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. नेमका तोच तलाव गेल्या आठवडय़ात फुटला. त्याच तलावातून तीस्ता नदीत निचरा होणाऱ्या पाण्याच्या मार्गावर जलविद्युत प्रकल्प उभारण्यात आला आहे. तेव्हा तो मातीत मिसळणे ओघाने आलेच. इतक्या स्पष्ट इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि मुख्य म्हणजे आपल्या वरिष्ठांस 'नाही' म्हणण्याची शामत नसलेल्या हाती सरकारी यंत्रणा गेल्यास आणखी वेगळे काय होणार हाही प्रश्न.

सिक्कीमच्या पुराने आणखी एका मुद्दय़ाच्या चर्चेस तोंड फोडले. तो म्हणजे आपल्या धरणांचे वय आणि त्यांचे आरोग्य. आपल्या देशात जवळपास पाच हजारांहून अधिक मोठी धरणे आहेत. त्यातील साधारण २३४ धरणांनी चक्क आपल्या वयाची शंभरी पूर्ण केली आहे आणि साधारण हजारभरांहून अधिक धरणे ही ५० ते शंभर वर्षे या वयोगटातील आहेत. सिक्कीममध्ये फुटलेले धरण तर जेमतेम विशीतले होते. ही बाब देशभरातील अन्य वयस्कर धरणांच्या मजबुतीचा राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेण्याची गरज दाखवून देते. तथापि नवे काही भव्यदिव्य उभारणीची हौस असलेल्यांस जुन्यांच्या सक्षमीकरणाचे महत्त्व आहे किंवा काय, हा प्रश्न. या धरणांतील गाळ आणि त्यामुळे त्यांची कमी होणारी उपयुक्तता आणि त्याच वेळेस धरणांच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यास या वयपरत्वे अशक्त झालेल्या धरणांची साठवणक्षमता या दोनही आघाडय़ांवर या धरणांबाबत काळजी करावी अशी परिस्थिती आहे. धरणांतील गाळ काढणे आणि त्यांचे मजबुतीकरण हे दोन्ही खर्चीक आणि वेळकाढू. कफल्लक राज्य सरकारांना ते परवडणे अवघड. अशा वेळी पर्यावरणास आव्हान देतील असे प्रकल्प निदान टाळण्याचा शहाणपणा तरी सत्ताधीशांनी दाखवायला हवा. त्यासाठी भव्यदिव्य चमकत्या प्रकल्पांच्या ऐवजी आहे त्याची मजबुती, सक्षमीकरण करणाऱ्या प्रक्रियांकडे लक्ष द्यायला हवे. नवे उभारण्याच्या नादात आहे ते जुने सपाट व्हायला नको.



# भाजपचे बालक-पालक!

अजितदादा पवार यांना हवे होते ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाले याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे की ते ज्यांच्या हातून गेले त्या चंद्रकांतदादा पाटील यांच्याविषयी दु:ख, कणव इत्यादी सहवेदना व्यक्त करावी हा तसा गंभीरच प्रश्न. जे काही झाले वा भाजपने करून घेतले त्याचे वर्णन पाहुण्याच्या वहाणेने यजमानाने स्वत:च्या श्रीमुखात मारून घेणे असे करता येईल..अजितदादा पवार यांना हवे होते ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाले याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे की ते ज्यांच्या हातून गेले त्या चंद्रकांतदादा पाटील यांच्याविषयी दु:ख, कणव इत्यादी सहवेदना व्यक्त करावी हा तसा गंभीरच प्रश्न. दोघेही दादा. त्यात चंद्रकांतदादा तर भाजपचे कर्ते-धर्ते अमित शहा यांच्याशी सासुरवासीय सख्य राखून असलेले. पण तरी त्यांना डावलून अमितभाईंनी अजितदादांकडे पुण्याचे पालकमंत्रीपद दिले यामुळे दादांच्या (चंद्रकांत) मनास किती यातना झाल्या असतील याची कल्पना अतुल भातखळकर किंवा तत्समच करू शकतील. शेवटी 'घर की मुर्गी दाल बराबर' हेच खरे! (भातखळकरांनी मुर्गीच्या जागी तुरीची डाळ आणि 'दाल'च्या जागी केशरी दाल असे वाचावे!) बाकी राजकारणात नशीब घेऊन यावे ते अजित पवारांसारखे. कोणताही पक्ष, कोणत्याही आघाडय़ा सत्तेवर येवोत. उपमुख्यमंत्रीपद अजितदादांसाठी हमखास असणारच. त्याअर्थी अजितदादा म्हणजे एकविसाव्या शतकातील बाबू जगजीवनरामच म्हणायचे. सत्ताधारी आपले असोत की परके! दादा रुसले की सगळेच त्यांच्या नाकदुऱ्या काढायला येणार. घरचा पक्ष सत्तेवर असेल तर सर्व पापे पोटात घालायला, परक्यांशी हातमिळवणी करून आल्यावरही 'सुबह का भूला शामको घर आये तो उसे भूला नही कहते', असे म्हणत सर्वांवर पांघरूण घालायला काका आहेतच! मधल्या मध्ये शत्रुपक्षाशी हातमिळवणी करून सिंचन घोटाळय़ातून स्वत:चे नाव पुसून टाकण्याचे त्यांचे कसबही वाखाणण्यासारखेच. ते करायचे, परत स्वगृही यायचे, उपमुख्यमंत्री व्हायचे, सरकार गेल्यावर ते ज्यांच्या हाती गेले त्यांच्याशी पुन्हा हातमिळवणी करायची आणि पुन्हा उपमुख्यमंत्रीपद मिळवायचे हे काही येरागबाळय़ाचे काम नाही. त्यासाठी पवारच हवे! एका बाजूने स्वकीय काका आणि दुसऱ्या बाजूला परपक्षीय अमित शहा इतकी भक्कम तटबंदी निर्माण करू शकणारा राजकारणी, आचार्य अत्रे यांच्या शब्दांत सांगावयाचे तर, गेल्या दहा हजार वर्षांत या राज्यात झाला नाही. तेव्हा पुण्याचे पालकमंत्रीपद हिसकावून घेण्यात यश आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन आणि अपयशासाठी दुसऱ्या दादांचे सांत्वन करून जे झाले त्याविषयी काही.. जे काही झाले वा भाजपने करून घेतले त्याचे वर्णन पाहुण्याच्या वहाणेने यजमानाने स्वत:च्या श्रीमुखात मारून घेणे असे करता येईल. वास्तविक अलीकडेपर्यंत भाजपचे आणि त्यांच्या उच्चवर्णीय समर्थकांचे सोवळे पवार काका-पुतण्यांचे नाव जरी घेतले तरी मोडत असे. अजित पवार यांचा कथित सिंचन भ्रष्टाचार हा तर भाजपच्या राजकीय विजयाचा पाया होता. त्याआधी थोरल्या पवारांनी त्या वेळी पुरवलेल्या रसदीवर गोपीनाथ मुंडे आदींची कारकीर्द उभी राहिली. पवार यांच्याप्रमाणे त्यांचे सहकारी राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल हेदेखील भाजपच्या नैतिकतावाद्यांसाठी अब्रह्मण्यम होते. त्यांच्या मतदारसंघात जाऊन सर्वशक्तिमान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या नायनाटाची हाक दिली होती. तेव्हा भाजपतील अनेक पापभीरूंस वाटले 'झाले.. पटेलभाईंचे दिवस भरले'. पण कसचे काय! आज परिस्थिती अशी की अजित पवार हे जणू भाजपचे जावई आहेत असे वाटावे आणि प्रफुल्लभाई व्याही. काय मान आहे उभयतांस भाजपत! राज्य भाजपत अजित पवार त्यांना हवे ते करून घेऊ शकतात आणि दिल्लीत बसून प्रफुल्लभाई त्यांचा मार्ग निष्कंटक करतात. तथापि भाजपची सून नकटी असती तर तिला पदरात घेतले म्हणून या उभयतांविषयी भाजपच्या मनात असलेली आदराची भावना एक वेळ समजून घेता आली असती. पण तसे काही नाही. भाजपची ही सून अंगापिंडाने भरलेली आणि चांगलीच 'कमावती'देखील. या सुनेच्या संसारास आधीचे शिवसेना हे सासर हवा तसा हातभार लावायला होतेच. तरीही अजित पवार आणि कंपूंचे चोचले पुरवण्याची गरज या भाजपस वाटते याचे आश्चर्य. हे चोचले पुरवणे पालकमंत्रीपदावरच थांबणारे नाही. आधी उपमुख्यमंत्रीपद, अर्थखाते, पालकमंत्रीपद आणि आता त्यानंतर हव्या त्या ठिकाणी हवे ते पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी असा हा प्रवास असेल यात शंका नाही.ते पुरवले जातात याचे कारण धाकल्या अजित पवार यांच्या राजकीय ताकदीबाबत भाजपच्या दिल्लीश्वरांस असलेला गैरसमज. त्यातही त्यांचे मराठा असणे. अलीकडे भाजप बेरजेच्या राजकारणात मराठा नेतृत्वास आकृष्ट करताना दिसतो. शिवसेनेतील एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीतील अजित पवार आणि छगन भुजबळ वगळता अन्य कंपूस चुचकारणे, राधाकृष्ण विखे पाटील यांचे वाढते प्रस्थ ही याची उदाहरणे. विस्तारवादी राजकारणात हे योग्यच. पण हा विस्तार करताना स्वत:ची ओळख विसरून चालत नाही. सत्तामदाचा गंध घेत धुंद झालेला भाजप आता स्वत:चीच ओळख विसरत चाललेला आहे. किंबहुना अशी काही ओळख आपली होती, तशी ती असायला हवी याची गरज त्यास वाटेनाशी झाली आहे. सहा दशकांहून अधिक काळ सत्ता भोगल्यावर काँग्रेसचेही असे झाले होते. तथापि भाजपचे मोठेपण म्हणजे त्यांनी स्वत:बाबत ही वेळ अवघ्या दशकभरात आणली. पुढची पिढी आधीच्यापेक्षा अधिक प्रगत असते असे म्हणतात; ते याचमुळे बहुधा! आज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात अनेक महत्त्वाच्या पदांवरील राजकीय व्यक्ती भाजपेतर पक्षातील आहेत. ही अन्य पक्षीयांची भाजपतील चलती पाहता एक प्रश्न पडतो.तो असा की संस्कारी राजकारण्यांसाठी वर्ग चालवा, बौद्धिके घ्या, प्रभात-सायं शाखा चालवा वगैरेची आता गरजच काय? कोणत्याही मार्गाने सत्ता मिळवा आणि अन्य पक्षांतील संभाव्य विजयींची आयात करून ही सत्ता अधिकाधिक लांबवा हे समीकरण दीर्घकालीन गुंतवणुकीवरील परताव्यापेक्षा अधिक फलदायी आहे. किती ते भाजपचे सध्याचे राजकारण पाहता लक्षात यावे. वाईट वाटते ते या अशा झटपट फलाची चटक लागल्यामुळे दीर्घकालीन देश आणि पुढची पिढी वगैरे घडवण्याच्या मार्गाने भाजपत राहून भाजपत वाढीची स्वप्ने पाहणाऱ्यांचे. आता चंद्रकांत दादांचेच पाहा. दादा कोल्हापुरी. त्यांच्याकडून पुण्याचे पालकमंत्रीपद हिसकावून घ्यायचेच होते तर कोल्हापूरचे तरी द्यायचे. तेही नाही. कोल्हापुरात दादांच्या नाकावर टिच्चून बसवले कोणास? तर भ्रष्टाचार इत्यादींचे आरोप झालेल्या हसन मुश्रीफांस. त्याचा भाजपस हिंदू-मुस्लीम समरसता प्रदर्शनात उपयोग होईलही. पण चंद्रकांत दादा आणि अन्य संस्कारींचे काय? बिचारे विजयकुमार गावित. किती पक्षांतून भाजपत आले. आपले आदिवासी विकास कल्याण आणि नंदुरबारचे पालकमंत्रीपद अबाधित राहावे इतकीच काय ती त्यांची मनीषा. तीही भाजपने पूर्ण होऊ दिली नाही. ते थेट भंडाऱ्यात पाठवले गेले. बीडमध्ये गोपीनाथकन्या पंकजा मुंडे लक्ष वेधण्यासाठी जिवाचे किती रान करतात. पण त्यांना मंत्रीपद वगैरे नाहीच; उलट त्यांच्या वडिलांशी प्रतारणा करून राष्ट्रवादीत गेलेल्या धनंजयाकडे जिल्ह्याची सूत्रे. असो.हे सगळे खरे तर भाजपशी पाट लावणाऱ्या एकनाथ शिंदे गटाचीही झोप उडवणारे आहे. शिंदे यांचे ठीक.

# कॉम्रेड डांगेंच्या नेतृत्वाखाली मुंबईतील गिरणी कामगार लढवय्या झाला होता – प्रा डॉ अशोक चौसाळकर

भारतीय कामगार चळवळीचे कॉम्रेड डांगे हे अग्रगण्य नेते होते. डांगेंच्या नेतृत्वाखाली मुंबईतील गिरणी कामगार लढवय्या झाला आणि अनेक दशके त्यांनी रोमहर्षक संघर्ष केला १९२० पासून डांगे यांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या संग्रामात भाग घेतला, भारतीय कामगार चळवळीचा जन्म, बाल्यावस्था व निरनिराळ्या स्थित्यंतरातून जात असताना आलेले अडथळे आणि झालेला विकास याचे ते साक्षीदार होते. लाखो कामगारांची संख्या असलेल्या आयटक या भारतातील मोठ्या संघटनेचे ते अनेक वर्षे सरचिटणीस होते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीचे एक नामवंत पुढारी होते. त्यामुळे त्यांचे जगभरच्या सुप्रसिद्ध नेत्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते. आंतरराष्ट्रीय राजकारण व कामगार चळवळ यात डांगें यांच्याइतकी मान्यता इतर कोणत्याही कम्युनिस्ट नेत्यास प्राप्त झाली नाही असे मत प्रा. डॉ. अशोक चौसाळकार यांनी मांडले. मुंबईतील माजी नगरसेवक कॉम्रेड जयवंत पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कॉम्रेड डांगे यांच्या १२४ वा जयंती कार्यक्रम प्रभादेवी येथील 'भुपेश गुप्ता भवनात आयोजित केला होता,चौसाळकर हे कॉम्रेड डांगे आणि कम्युनिस्ट चळवळ या विषयावर आपले विचार मांडत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकवाङ्मय गृहाचे कॉ राजन बावडेकर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मुंबई सचिव कॉ मिलिंद रानडे, कॉम्रेड प्रा क्रांती जेजुरकर, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला इस्त्राएल आणि हमास यांनी एकमेकांवर हल्ले करून युद्ध सुरु केल्यामूळे निरपराध नागरिकांची हत्या होत आहे या नरसंहाराचा निषेध करून ठराव करण्यात आला. हा ठराव कॉ मिलिंद रानडे यांनी मांडला त्यावेळी त्यांनी आवाहन केले की, फॅसिझमच्या विरोधात लढताना पक्षाची ताकद कमी असेल किंबहुना त्यांचा पराभव करण्यासाठी आमच्याकडे साधने कमी असतील परंतु कामगारांनी आणि शेतकऱ्यांनी सरकारच्या न पटणाऱ्या धोरणाविरोधात आणि अन्यायाविरूद्ध आवाज उठवला पाहिजे. चौसाळकर यांनी डांगे यांच्या बालपणापासून १०२० ते १९८० या कालखंडातील आयुष्याचे चार भागात विभागणी करून विषयाची मांडणी करताना पुढे म्हणाले की, कॉ. डांगे हे महाराष्ट्राच्या इतिहासाचे व संस्कृतीचे खोल असे अभ्यासक होते. महाराष्ट्राच्या राष्ट्रकाची जडणघडण कशी झाली हे पाहण्यात त्यांना आस्था होती. मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले पाहिजे, असे त्यांचे मत होते. भारतीय संघराज्य हे स्वतंत्र, स्वायत्त घटकराज्यांचा संघ असावा अशीच त्यांची या बाबतची भूमिका होती. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेस त्यांचा पाठिंबा होता. डांगे हे जनतेचे पुढारी होते. डांगे यांचे संपूर्ण जीवन अभ्यासले तर ते समाजातील पीडित, शोषित व दारिद्राने गांजलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी वाहिलेले होते हे लक्षात येते. ते अत्यंत उत्तम वक्ते आणि नेहमी चळवळीत व्यस्त असत. स्वातंत्र्यत्तोर भारतातील अनेक चळवळीत ते अग्रभागी होते. आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर अनेक सभा त्यांनी जिंकल्या होत्या. कॉम्रेड डांगे यांनी रशियाच्या सर्वोच्च नेत्यांशी गाठीभेटी होत असत. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीची भूमिका सातत्याने वेगवेगळ्या परिषदांत मांडली, म्हणून त्यांना वयाच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त रशियन सरकारने लेनिन पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला होता. गोवा मुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ त्यांनी हिरीरीने लढविली. डांगे हे इतिहास, साहित्य व संस्कृती यांचे श्रेष्ठ भाष्यकार होते. खऱ्या अर्थाने कॉ डांगे हे एकोणिसाव्या व विसाव्या शतकात सुरु झालेल्या प्रबोधन पर्वाचे अपत्य होते व त्या व्यापक चळवळीचे ते शेवटचे प्रतिनिधी होते. कॉम्रेड प्रा क्रांती जेजुरकर या आपल्या भाषणात म्हणाल्या की, कॉ डांगे यांचे वक्तृत्व असाधारण होते. मैदानी सभा गाजवणारे डांगे कमालीचे मिश्किल होते. त्यांच्या घरी गेल्यानंतर चर्चा करताना साहित्य, संस्कृती, कला व इतिहास यांचा त्यांनी सखोल असा अभ्यास केला होता हे माझ्या लक्षात आले होते. तर रवींद्र मालुसरे आपल्या भाषणात म्हणाले की, लोकमान्यांचे २ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईत निधन झाल्यानंतर त्यांना अग्नी दिला त्या ठिकाणी एक तरुण पहाटे जातो, त्याच्या डोळ्यात अश्रू आणि मनात असंख्य वेदना असतात. दुःखी अंतःकरणाने तो तरुण त्याठिकाणची चिमूटभर राख सोबत आणलेल्या डबीत घरी घेऊन जातो आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत देवघरात ठेवतो. तो तरुण म्हणजे कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे होत, तरुण डांगे हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. चारित्र्य, स्वार्थत्याग, झुंजारपणा व आलेल्या संधीची आपल्या अंगीकृत कार्यार्थ राबवून घेण्याची मुत्सद्देगिरी याबाबत डांगे फक्त टिळकांशी बरोबरी करतात. माडखोलकरांनी व्यक्त केलेल्या मताशी सर्वजण सहमत आहेत. कॉम्रेड डांगे यांनी गिरणगावात कामगारांचा लढा लढवताना संघर्ष केला, सर्वत्र लाल झेंडे लावले, गिरण्यांचे गेट अडवले मात्र कम्युनिस्ट चळवळ थंडावल्यानंतर गिरण्यांचे भोंगे जाऊन मोठमोठे टॉवर्स उभे राहिले आहेत. डांगे सारखे संघर्ष करणारे नेते आणि कॉ जयवंत पाटलांसारखे तळागाळात जाऊन निष्ठेने आणि निर्भयपणे काम करणारे कार्यकर्ते सुद्धा आज राहिले नाहीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉ मधुकर कदम यांनी केले. कॉ अनंत मोरे, कॉ बाबा सावंत,कॉ चित्तरंजन कांबळे,कॉ विश्वनाथ घवाळी, कॉ विजय मोरे, कॉ बबन वगाडे, कॉ प्रकाश बागवे, कॉ मंगला सावंत, कॉ नंदा जाधव, कॉ लक्ष्मण चिंतल, कॉ मामिडाल या जन्मशताब्दी समितीच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.




--
रवींद्र मालुसरे
अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई
९३२३११७७०४

# अनोळखी प्रोफाईल्सच्या जाळ्यात

भेटणारा प्रत्येक व्यक्ती काही मुलांना फसवायला बसलेला नसतो, पण ऑनलाईन जगात अनेक फेक प्रोफाईल्स घेऊन गुन्हेगार फिरत असतात. ऑनलाईन जगात गेल्यानंतर मुलांना नवीन मित्रमैत्रिणी बनवायला खूप आवडतं. त्यांच्या नेहमीच्या मित्र मैत्रिणींचा मित्र परिवार, त्या मित्रपरिवाराचा मित्रपरिवार. त्यातल्या कुणाच्यातरी वॉलवरुन आलेली प्रोफाईल्स, अकाउंट्स पब्लिक असतील तर पूर्णपणे अनोळखी व्यक्तींनी पाठवलेल्या फ्रेंड रिक्वेस्ट अनेक मुलं धडाधड स्वीकारतात. देशी विदेशी मित्रपरिवार बनवण्याकडे मुलांना भर दिसून येतो. मुळात टीनएजमध्ये वयानुसार असलेलं थ्रिलचं आकर्षण हा त्यातला महत्वाचा घटक असतो.मला अमेरिकन, ऑस्ट्रेलियन, सिंगापूर, मलेशियन मित्र आहेत हे चारचौघात सांगताना कॉलर टाईट होते. त्यामुळे आपल्या नेहमीच्या मित्र परिवाराच्या पलीकडे अनेकांशी मुलं ओळख करुन घेतात. मैत्री करतात. अगदी बेस्ट फ्रेंड्स ही होतात. या सगळ्या गोष्टींपासून मुलांना सावध करणं पालक आणि शिक्षकांची जबाबदारी आहे. भेटणारा प्रत्येक व्यक्ती काही मुलांना फसवायला बसलेला नसतो, पण ऑनलाईन जगात अनेक फेक प्रोफाईल्स घेऊन गुन्हेगार फिरत असतात. निरनिराळ्या विकृती असलेली माणसं स्वतःचा खरा चेहरा लपवून भलतेच उद्योग करत असतात. पेडोफाईल्सचा तर ऑनलाईन जगात सुळसुळाट आहे. अशावेळी आपल्या मुलांच्या संपर्कात आलेली व्यक्ती कोण आहे, ती खरी आहे का, फेक प्रोफाइल वापरणारा कुणी गुन्हेगार तर नाही ना हे डोळ्यात तेल घालून बघितलं पाहिजे. ही गोष्ट दर वेळी पालक करु शकतीलच असं नाही. अशावेळी या धोक्यांची माहिती, त्यापासून दूर राहायचं कसं याचं प्रशिक्षण मुलांना असणं आवश्यक आहे.मुलांना सांगा या काही गोष्टी! आपल्याला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवणारा प्रत्येकजण हा जेन्युईन आहे, खरा आहे असं मानून चालायचं नाही. अनेकदा मुलं समोरची व्यक्ती जे काही सांगेल, स्वतःची जी काही माहिती देईल,ती खरी आहे असं मानून चालतात. विश्वास टाकतात आणि फसवले जातात. ही फसवणूक विविधस्तरीय असते. कधी प्रेमाचं नाटक, कधी आर्थिक फसवणूक, कधी सेक्सटॉर्शनचे प्रकार होतात. त्यातून होणारा मानसिक त्रास, स्व प्रतिमेला तडे जाणं या सगळ्याचा त्रास ना मोजता येणारा आणि भरून काढता न येणारा असतो. आपण फसवले गेलो ही भावना कुणाला आवडते सांगा? म्हणूनच सोशल मीडियावर मैत्री करत असताना चार चार वेळा तपासून बघायला हवं हे मुलांना सांगा.कुणाचीही फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारण्याआधी त्या व्यक्तीच्या प्रोफाईलवर जाऊन एक चक्कर मारा. काय काय शेअर केलं आहे, कशाप्रकारचे फोटो शेअर केले आहेत, काय पोस्ट्स लिहिल्या किंवा शेअर केल्या आहेत, ती व्यक्ती कुणाला फॉलो करते, विचारधारा काय आहे हे सगळं एकदा नजरेखालून घाला. त्यानंतर फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारावीशी वाटली तरच स्वीकारा. स्वीकरल्यानंतरही जर ती व्यक्ती तुमच्या पोस्टखाली काहीतरी वेडंवाकडं लिहीत असेल, मेसेंजरवरून काहीतरी चुकीचं सातत्याने पाठवत असेल, चॅटिंगसाठी आग्रह धरत असेल आणि त्या सगळ्याचा तुम्हाला त्रास व्हायला लागला तर अशा व्यक्तीला लगेच ब्लॉक केलं पाहिजे, जेणेकरून तुमच्या वॉलवरची त्या व्यक्तीची अनावश्यक लुडबुड थांबू शकेल. एक लक्षात ठेवलं पाहिजे, सोशल मीडियावर अगणित फेक प्रोफाईल्स आहेत. लोकांना फसवण्याचे रोज नवे उदयोग शोधले जातात. जर कुणी ऑनलाईन फ्रेंड पैशांची मागणी करत असेल, त्यासाठी कितीही दर्दभरी स्टोरी सांगितली असेल तरीही जोवर तुमची खातरी पटत नाही मैत्रीचा हात पुढे करायचा नाही.अनेकदा मुलं विचारतात की मग आम्ही कुणावरच विश्वास ठेवायचा नाही का?आपल्याला मुलांना अविश्वास शिकवायचा नाहीये, पण सतर्कता शिकवलीच पाहिजे. ती कशी शिकवता येईल?समजा, त्या व्यक्तीने (अनोळखी पण आता मैत्री करू इच्छिणारा असं समजू या..) चॅटिंगवर सेक्सटिंग सुरु केलं, अश्लील इमेजेस, व्हिडीओ, जोक्स पाठवले ज्याने मुलांना अतिशय अवघडलेपण आलं तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलं बरं.समजा, मैत्री झाल्यावर अचानक पालकांचा, त्याचा / तिचा स्वतःचा पॅन, आधार नंबर, बँक डिटेल्स, घराचे डिटेल्स मागायचा सुरुवात केली, रेड अलर्ट! कधीही कुठलीही वैयक्तिक माहिती शेअर करु नये.समजा, एखादी व्यक्ती फार जास्त गोडगोड वागतेय, मुलांच्या प्रत्येक होकार–नकाराशी जुळवून घेत असेल, मुलांना सतत मीच फक्त तुला समजून घेतो इतर कुणीही, अगदी पालकही समजून घेत नाहीत असं सांगत असेल तर रेड अलर्ट आहे.समजा, अनोळखी व्यक्ती ट्रोल करत असेल, वाह्यात बोलत असेल तर त्याच्याशी बोलायला न जाता सरळ ब्लॉक करायला मुलांना शिकवा. कधीही अनोळखी व्यक्तींशी सेक्स्टिंग, सेक्स फोटो, व्हिडीओ क्लिप्सची देवाण घेवाण करु नाही.

या गोष्टी मुलांना नक्की सांगा आणि त्यांना अनोळखी व्यक्तींपासून दूर राहायचं कसं हे शिकवा.




# तुम्ही एका महिन्यात एकदाही कोल्ड्रिंक प्यायला नाहीत तर.. डॉक्टरांकडून जाणून घ्या शरीरात होणारे बदल

कोल्ड्रिंकने होणाऱ्या नुकसानाऐवजी आपण समजा जर महिनाभर कोल्ड्रिंक प्यायचे बंद केले तर काय फायदे होऊ शकतात याविषयी जाणून घेऊया.. अनेकांना जेवणाबरोबर विशेषतः मांसाहार करताना किंवा पचायला जड असे जेवण जेवताना कोल्ड्रिंक (सॉफ्टड्रिंक) घेण्याची सवय असते. यातील सोड्यामुळे अन्न पचायला मदत होते असे युक्तिवादही काहीजण करताना दिसतात. तर काहींना ॲसिडिटी किंवा पोटात जळजळ होत असल्यास सोडायुक्त कोल्ड्रिंक आराम देतात असे वाटते. आता या सामान्य माणसांच्या समजुतीवर तज्ज्ञांनी मात्र अनेकदा आक्षेप घेतला आहे. आजवर अनेक तज्ज्ञांनी वारंवार कोल्ड ड्रिंक्स पिण्याने होणाऱ्या नुकसानाविषयी भाष्य केलं आहे. आपणही त्याबाबत जाणून असाल त्यामुळे कोल्ड्रिंकने होणाऱ्या नुकसानाऐवजी आपण समजा जर महिनाभर कोल्ड्रिंक प्यायचे बंद केले तर काय फायदे होऊ शकतात याविषयी जाणून घेऊया..महिनाभर कोल्ड्रिंक न प्यायल्याने होणारे फायदे यशोदा हॉस्पिटल्स, हैदराबादचे फिजिशियन डॉ. सोमनाथ गुप्ता यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, महिनाभर कोल्ड्रिंक्स सोडल्यास वजन, हायड्रेशन आणि पचनावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. तुमची लालसा कमी झाल्यामुळे तुमची हायड्रेशन पातळी सुधारेल. शिवाय ३० दिवसात साखर आणि कॅफिनचे सेवन झपाट्याने कमी होईल व भविष्यात त्यासाठीची लालसा सुद्धा नियंत्रणात राहू शकते. याशिवाय तुमच्या शरीराचे तापमान नियमित होऊ शकते कारण थंड पेय टाळल्याने शरीराला वारंवार उष्ण, मध्यम किंवा थंड तापमानामध्ये बदल करावे लागणार नाहीत.

यशोदा हॉस्पिटल्स, हैदराबादचे अन्य तज्ज्ञ डॉक्टर, डॉ दिलीप गुडे यांनी सुद्धा याविषयी माहिती देत म्हटले की, कोल्ड्रिंक टाळल्याने तुमचे पोट वारंवार बिघडण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. तुमचे निरोगी आतडे चांगल्या मायक्रोबायोटाची वाढ करून खराब बॅक्टेरिया कमी करेल.दातांच्या आरोग्यामध्ये सुधारणा करण्यासाठी गोड पेय टाळणे हे किती फायद्याचे आहे हे तर तुम्ही जाणताच, दातांना विशेषतः दाढींना लागणारी कीड व तयार होणारी पोकळी कमी होऊ शकते.जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर कोल्ड्रिंक सोडणे ही तुमच्यासाठी एक चांगली सुरुवात असू शकते. कारण तुम्ही तुमच्या दैनंदिन कॅलरीजचे सेवन कमी करू शकता.कोल्ड्रिंकच्या रूपात आहारात जोडल्या जाणाऱ्या साखरेचे प्रमाण कमी होऊन इंसुलिनची संवेदनशीलता वाढते. यामुळेच सौम्य स्वरूपात मधुमेह असणाऱ्या व्यक्ती सुद्धा प्री–डायबेटिक किंवा नॉन–डायबेटिक स्टेजमध्ये परतु शकतात.कोल्ड्रिंक बंद करण्याचे फायदे अजूनही संपलेले नाहीत बरं.. यामुळे तुमच्या त्वचेचा कोरडेपणा आणि मुरुमांच्या समस्या सुद्धा कमी होऊ शकतात.

# फ्रीजमध्ये स्टोअर केलेलं अन्न, पोषण टिकवण्यासाठी बेस्ट! योग्य पद्धत व फायदे आहारतज्ज्ञांकडून जाणून घेऊया

तुम्ही फ्रीजमध्ये ठेवलेल्या पदार्थांचे पोषणमूल्य कमी– जास्त होणे हे सर्व भाजीपाल्याच्या प्रकारावर, कापल्यापासून मूळ वापरापर्यंतचा वेळ आणि गोठवण्याच्या/साठवण्याच्या विशिष्ट पद्धतींवर अवलंबून असते. निरोगी आरोग्य हवे असेल तर नेहमी ताजी फळे, भाज्या, ताजे शिजवलेल्या अन्नाचेच सेवन करावे असे सांगितले जाते. पण काही वेळा सुविधांचा अभाव किंवा हंगामी फळे व भाज्यांचे सेवन सर्व मोसमात करायचे असल्यास त्यांना स्टोअर करून ठेवणे भाग असते. फ्रीजर मध्ये स्टोअर केलेल्या पदार्थांच्या पोषण मूल्याबाबत अनेकांना काही गोष्टी ठाऊक नसतात त्यामुळे प्रत्येकजण यामुळे नुकसान होऊ शकते असं सांगतो. पण अलीकडेच रितिका समद्दार, प्रादेशिक प्रमुख, पोषण आणि आहारशास्त्र, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, दिल्ली, आणि भक्ती सामंत, कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई येथील मुख्य आहारतज्ज्ञ, यांनी इंडियन एक्सस्प्रेसला माहिती देताना अन्न फ्रीजरमध्ये ठेवण्याचे काही फायदे व योग्य पद्धत सांगितली आहे.लक्षात घ्या: सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तुम्ही फ्रीजमध्ये ठेवलेल्या पदार्थांचे पोषणमूल्य कमी– जास्त होणे हे सर्व भाजीपाल्याच्या प्रकारावर, कापल्यापासून मूळ वापरापर्यंतचा वेळ आणि गोठवण्याच्या/ साठवण्याच्या विशिष्ट पद्धतींवर अवलंबून असते. बहुसंख्य घरांमध्ये फ्लॅश फ्रीझिंग ही सामान्य प्रक्रिया वापरली जाते. यामुळे पाण्यात विरघळणारे जीवनसत्त्व, विशेषत: व्हिटॅमिन सीच्या कमीत कमी नुकसानासह सर्व पोषक घटक राखून ठेवता येतात. रितिका समद्दार सांगतात की, शेतातून उत्पादन (फळे आणि भाज्या) काढले की ते मूळ सेवन करेपर्यंत पोषण विरुद्ध वेळ अशी स्पर्धा सुरु असते. जर तुम्ही फळे आणि भाज्या फ्रीजरमध्ये किंवा अतिथंड तापमानात स्टोअर करत असाल आणि त्यांना पुन्हा रूम टेम्परेचर वर आणताच लगेच सेवन करणार असाल तर अशी पद्धत फ्रीजिंग व वापरासाठी सुरक्षित ठरू शकते.मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलमधील मुख्य आहारतज्ज्ञ भक्ती सामंत म्हणतात, फ्रोझन भाज्यांचे शेल्फ लाइफ ताज्या भाज्यांपेक्षा जास्त असते.

यात तुम्हाला अतिरिक्त मीठ किंवा साखर न घालता, भाज्या स्टोअर करता येतात त्यामुळे अधिक सोडियमचे सेवन किंवा ब्लड शुगरची वाढ अशाही चिंता कमी होतात. वेळ वाचवण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे कारण तुम्हाला माहित असतं की तुमच्याकडे कोणत्यावेळी किती सामना उपलब्ध आहे त्यानुसार तुम्ही स्वयंपाकाचे प्लॅन करू शकता.पालक व वाटाण्याच्या फ्रीजिंगचे फायदे (इशपशषळी जष ॠशशळपस झरश्ररज्ञ –पव झशरी) फूड टेक्नॉलॉजीच्या प्रगतीमुळे ताजे अन्न बनवल्यावर काही तासात गोठविले जाते आणि त्यावर प्रक्रिया केली जाते, ज्यामुळे बरेच पोषण राखून ठेवता येते. म्हणूनच काहीवेळा नुसताच किचनमध्ये ठेवलेला पालक सात दिवसात १०० टक्के व्हिटॅमिन सी गमावू शकतो तसेच त्याचे ऑक्सिडेटिव्ह नुकसान होते. पण शेतातून काढल्यावर लगेच गोठवलेला पालक शिजेपर्यंत व्हिटॅमिन टिकवून ठेवतो. पालक शिजवताना सहसा आधी गरम पाण्यात उकळून मग स्टोअर केला जातो त्यामुळे व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन ए, लोह आणि फोलेट यासह त्यातील बहुतेक पोषक घटकांचे संरक्षण होते.गोठवलेले वाटाणे पिकण्याच्या शेवटच्या टप्प्यात काढले जातात आणि त्वरीत गोठवले जातात.

# हेरंब कुलकर्णी हल्ला प्रकरणी फरार आरोपी अटकेत

अहमदनगर : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्यावर हल्ला करून फरार झालेल्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यापूर्वी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिघांना सोमवारी रात्री पकडले होते, त्यात अक्षय सब्बन, चैतन्य सुडके आणि एक अल्पवयीन मुलगा यांचा समावेश होता. या गुन्ह्यात सहभागी असलेले दोघे पसार झाले होते. पोलिसांनी फरार आरोपींचा पिच्छा पुरवला आणि आता त्यांनाही तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



सनी जगधने, अक्षय माळी अशी त्यांची नावं आहेत. दरम्यान, सुपारी घेऊन हेरंब कुलकर्णी यांच्यावर हल्ला करण्यात आल्याचे समोर आले होते. पण याबाबत बोलताना पोलिसांनी घूमजाव करत, यासंदर्भात पोलिस तपास सुरू असल्याचे म्हटले आहे. हेरंब कुलकर्णी हल्ला प्रकरणात पानटपरीचालकाचा समावेश असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याचबरोबर हल्ला करण्यासाठी १५ हजार रुपयांची सुपारी देखील देण्यात आल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. अतिक्रमणात असलेली पानटपरी काढून टाकण्यासाठी कुलकर्णी यांनी महानगरपालिकेत अर्ज केला होता. त्यानुसार महापालिकेने कारवाई देखील केली होती. त्याचा राग मनात धरून संशयित अक्षय सब्बन याने त्याच्या पाच साथीदारांच्या मदतीने कुलकर्णी यांच्यावर हल्ला केल्याचे बोलले जात आहे.

हल्ला करणा–यांमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे. मात्र तो मुलगा खरेच अल्पवयीन आहे का? याची देखील चौकशी करणे गरजेचे आहे, असा सवाल हेरंब कुलकर्णी यांनी उपस्थित केला आहे.


# डोळय़ांची काळजी..

शरीरातील सर्वात जास्त संवेदनशील त्वचा ही डोळय़ांभोवतीची असते. त्यामुळे त्याची काळजी योग्य प्रकारे घेणे आवश्यक आहे. डॉ. वैशाली वलवणकर पंचेंद्रियांपैकी महत्त्वाचे इंद्रिय म्हणजे डोळे. अतिशय संवेदनशील अवयव असून त्याला प्रकाशाची जाणीव होते. डोळे नसले तर आपण काहीच पाहू शकणार नाही. कशाचाच अनुभव सुद्धा घेऊ शकत नाही. डोळे हे खूप नाजूक असतात. त्यांची काळजी घेणे आवश्यक असते. आपण दररोज डोळय़ांची काळजी घेण्याच्या सवयींचा सराव केल्यास डोळय़ाच्या अडचणी सहज टाळता येतात. आपल्या डोळय़ाचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी आणि दृष्टी दृढ ठेवण्यासाठी, आपल्या रोजच्या नित्यकर्माचा भाग असावा त्यासाठी डोळय़ांची निगा व काळजी घेतली पाहिजे.शरीरातील सर्वात जास्त संवेदनशील त्वचा ही डोळय़ांभोवतीची असते. त्यामुळे त्याची काळजी योग्य प्रकारे घेणे आवश्यक आहे. धूर, धूळ, प्रदूषण, मोबाइलचा सतत वापर यामुळे डोळय़ांना ॲलर्जीचा त्रास होतो. त्याचप्रमाणे डोळय़ांभोवती काळी वर्तुळे दिसू लागतात.डोळय़ांची काळजी घेताना खालील गोष्टी करू नयेत १ चेहरा धुण्यासाठी अति गरम पाणी वापरू नये.२ डोळय़ांना सतत आयलायनर, मस्कारा वापरू नये.३ जवळून सतत मोबाइल वापरू नये.४ अंधारात टीव्ही किंवा मोबाइल पाहू नये. काय करावे? ' बाहेर उन्हात जाताना डोळय़ांवर गडद रंगाचा चष्मा किंवा गॉगल वापरावा.' डोळे थंड पाण्याने धुवावेत (दिवसातून ३– ४ वेळा) ' रात्री झोपताना नियमाने डोळय़ांना केलेला मेकअप काढावा आणि मॉईश्चरायझर लावावे.' रात्री झोपताना नरिशिंग व रिपेअर करणाऱ्या क्रीमचा वापर करावा.' योग्य अंतरावरून टीव्ही पहावा.' डोळय़ांचे व्यायाम करावेत.' काकडीचे काप, कोरफड गराचे आयपॅड थंडाव्यासाठी डोळय़ांवर ठेवावेत.

# ऑटोरिक्षा क्रेनला लटकवून ठाकरे शिवसेनेचे अनोखे आंदोलन

लातूर: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने होऊद्या चर्चा या कार्यक्रमाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ऑटो रिक्षा क्रेनला लटकवून रॅली काढून अनोखे अंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक सेना जिल्हाध्यक्ष त्र्यंबक स्वामी व शिवसेना सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. रिक्षामध्ये पुढील सीटवर प्रतिकात्मक मुख्यमंत्री व मागील सेटवर दोन उपमुख्यमंत्री बसवून सरकारचे लक्ष वेधून रिक्षा चालक कल्याणकारी महामंडळाचे अंमलबजावणी करावी, ऑटो रिक्षाचे परमिट बंद झाले पाहिजे ,राज्यातील कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या तसेच रिक्षावर झाड कोसळून अपघातामुळे मयत



झालेल्या रिक्षा चालकाच्या वारसाला आर्थिक मदत देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.

यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी, महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा सेना जिल्हाध्यक्ष त्र्यंबक स्वामी,महानगर प्रमुख विष्णूपंत साठे, तानाजी करपुरे, हनुमंत पडवळ, रिक्षात पाठीमागे बसलेले प्रतिकात्मक उपमुख्यमंत्री रिक्षा चालक कांबळे व रघुनाथ सपकाळ ,तसेच पुढील सिटवर प्रतिकात्मक मुख्यमंत्री तिन चाकाचे सरकार चालवणारे सिद्धनाथ लोमटे हे होते. या कार्यक्रमास रेणापूर येथील रिक्षा चालक गणेश नागमोडे, डिगांबर घोडके, संजय काळे ज्ञानेश्वर सिंपाळे, बाबा सिकलकर, नुरखाँ पठाण, नयुम शेख लातूर येथील विनोद मोरे, बालाजी बारबोले, भोकरे, गंगणे, सह अनेक रिक्षा चालक सहभागी झाले होते, या तिन चाकी सरकारचा धिक्कार असो अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या

# अॅड.ओमप्रसाद लोमटे यांची चझडउद्वारे शासकीय अभियोक्ता (गट-अ) पदी निवड

कळंब :- जवळा (खुर्द), ता कळंब जि धाराशिव गावचे सुपुत्र अॅड.ओमप्रसाद पांडुरंग लोमटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग (चझडउ) मार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमधून सहाय्यक सरकारी अभियोक्ता- गृह विभाग महाराष्ट्र राज्य (गट-अ) राजपत्रित पदासाठी निवड झाली आहे. ते धाराशिव येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल धाराशिव येथील माजी विद्यार्थी असून, त्यांनी कायद्याचीपदवी (इडङ डडइ) व पदव्युत्तर पदवी (डङ:च्) लॉ कॉलेज धाराशिव येथुन पूर्ण केले. जिल्हा व सत्र न्यायालय धाराशिव येथे वकिली व्यवसाय



करत असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली व यश संपादन केले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ते सौ.सुमन पांडुरंग लोमटे व ह.भ.प.अॅड पांडुरंग लोमटे महाराज यांचे चिरंजीव आहेत. परीक्षेची तयारी करत असताना त्यांना त्यांचे जेष्ठ बंधू उच्च शिक्षित अभियंता दत्तप्रसाद पांडुरंग लोमटे (आय आय टी बॉम्बे) व पुणे येथील कायद्याचे अधिष्ठान असणारे आव्हाड कुटूंबीय व बी.ई.आव्हाड लॉ क्लासेस चे संचालक प्रा.अॅड. गणेश बाप्पासाहेब शिरसाट सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात स्व. प्रा. डॉ. भौमिक देशमुख यांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली

लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील समाजकार्य विभागातर्फे स्व. प्रा. डॉ. भौमिक देशमुख यांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे आणि बालाजी डावकरे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, स्व. प्रा. डॉ. भौमिक देशमुख यांच्या निधनाची बातमी काल कळाली आणि त्यामुळे क्षणभर मन सुन्न झाले. त्यांचा अध्यापनाचा प्रवास हा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातून झाला.





त्यानंतर त्यांनी कर्वे समाजसेवा संस्था, पुणे, भारती विद्यापीठ, पुणे आणि त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या ठिकाणी व्यावसायिक समाजकार्याला व्यावसायिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. ते अत्यंत मनमिळावू, निर्मळ आणि निर्व्यसनी स्वभावाचे होते. त्यांच्या या अकाली निधनामूळे महाराष्ट्रातील सर्व व्यावसायिक समाजकार्याची क्षेत्रांमध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. तेव्हा आपण त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. त्यांच्या या निधनाबद्दल माजी प्राचार्य प्रा. जी. आर. मुचाटे, डॉ. आय. एम. शेटकार, समाजकार्य विभागप्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशिनाथ पवार, प्रा. दत्ता करंडे, प्रा. आशिष स्वामी आणि प्रा. नागेश जाधव यांनीही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला बी. एस. डब्ल्यू विभागातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठवाडा मायभूमी आमची

लातूर : प्रतिनिधी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ-२०२३' युवक महोत्सवात शाहीर संतोष साळुंके यांच्या 'मराठवाडा मायभूमी आमची'या पोवाड्याने युवक, युवती कलावंतांमध्ये जोश भरला. पोवाड्याची ललकारी शहारे निर्माण करणारी होती. डफावरील थाप आणि तुतारीचा निनांदाने सभागृहाला स्फुरण चढले होते.पोवाडा हा अस्सल मराठी वाङ्मयप्रकार असून तो तेराव्या शतकात उदयाला आला आणि सतराव्या शतकापर्यंत जोमात राहिला. 'पोवाडा' हा दृश्य, श्राव्य प्रकार आहे. पोवाड्याचा उल्लेख 'कीर्ती' काव्यात केला जातो. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या मते बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण, कौशल्येचे प्रतिक आहे. शाहीर संतोष साळुंके यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाड्याची महती सांगणारे 'मराठवाडा मायभूमी आमची' हा पोवाडा सादर केला. पहाडी आवाज, डफावरील थाप, तुतारीची ललकारी, डोलकीचा ठेका याचा अप्रतिम मेळ श्रवणीय होता.



# माही तुरुकमाने चित्रकला स्पर्धेत प्रथम

रिसोड : - श्री शिवाजी विद्यायल व कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन चित्रकला स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते या मध्ये कु. माही मिना प्रविण तुरुकमाने हिचा प्रथम क्रमांक आला आहे.

शालेय जिवनातच वेगवेगळ्या कला गुणांना वाव मिळून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये नावलौकिक करावे यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या कडून केले जात असते. याचाच फायदा सर्वसामान्य वर्गातील विद्यार्थ्यांना होऊन त्यांच्या कला गुणांना चालना मिळत असते. माही मिना प्रविण तुरुकमाने ही विद्यार्थींनी सुद्धा अभ्यासा व्यतिरिक्त इतर म्हणजेच नृत्य, चित्रकला, क्रीडा व अभिनय,



क्षेत्रात उत्तम प्रकारे प्राविण्य मिळवून अभ्यासासोबतच कलागुणांची जोपासना करते. अभ्यासा सोबतच इतरही कलागुण विद्यार्थ्यांकडे असतील तर यशाची व्याख्या बदलून प्रत्येक जन प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होईल. याच भावनेतून शिक्षकासह पालकांनी सुद्धां कलागुणांना वाव देणे आवश्यक असते. चित्रकलेची कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या माहीने अंत्यत सुंदर चित्रकला साकारून विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ओ हॅलो मी सिंगल

लातूर : कलंदर कलावंतांचा युवक महोत्सव, अशी ओळख असलेल्या युवक महोत्सवाला सुरुवात झाली आणि युवक, युवतींच्या उत्साहाला पारावार राहिला नाही. उधान आलेल्या उत्साहात स्वराज्य रक्षक संभाजी मालिका फेम प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी आपल्या भाषणात आणखी रंग भरला. ओ हॅलो मी सिंगल आहे, असे म्हणताच युवका वर्गातून आलेल्या शिट्ट्यांनी कानठळ्या बसण्याचीच वेळ आली होती.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ-२०२३' युवक महोत्सव येथील दयानंद कला महाविद्यालयात उत्साहाच्या वातावरणात सुरु झाला. उद्घाटन अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्या हस्ते झाले. त्यांनी बोलताना सभा मंडपातील युवक, युवतींशी सुसंवादच साधला. स्वराज्य रक्षक संभाजी महाराज या मालिकेत नऊवारी साडी नेसून घोडेस्वारी करणे महाराणी येसूराणी यांची भूमिका साकारताना घेतलेले कष्ट हा सर्व प्रसंग त्यांनी जशाचा तशा उभा केला. प्राजक्ता गायकवाड यांची प्रमुख भूमिका असलेला 'सिंगल' हा आगळावेगळी लवस्टोरी असलेला चित्रपट येत्या २७ ऑक्टोबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आताही मी सिंगलच आहे. इथे कोण कोण सिंगल आहेत, असे म्हणताच टाळ्या आणि शिट्ट्यांनी सभा मंडपात एकच जल्लोष झाला. मराठवाडा मुक्ती संग्राम सुवर्ण महोत्सवानिमित्त 'मुरारबाजी' या ऐतिहासीक चित्रपटासह देशातील सैनिकांना सलाम करणारा 'फौजी' हाही चित्रपट येणार असल्याचे प्राजक्ता गायकवाड म्हणाल्या.

# विलास सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांना दिल्या वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा

विलास सहकारी साखर कारखाना प्रशासनाच्या वतीने कार्यकारी संचालक संजीव देसाई, सेक्रेटरी एन.एन.काळोखे, फायनान्स मॅनेजर ओ.पी.ठाकरे, जनरल मॅनेजर (टेक्नीकल) एम.पी.भोरकडे, चिफ केमिस्ट एल.एम.देशमुख, डिस्टीलरी मॅनेजर डी.जे.जाधव यांनी चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख यांना वाढदिवसाच्या निमित्ताने भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.



लातूर / प्रतिनिधी : - विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विलास कारखाना संचालक मंडळाने त्यांची बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन आदरणीय वैशाली विलासराव देशमुख यांना वाढदिवसाच्या निमित्ताने विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन रवींद्र काळे, संचालक सर्वश्री गोंविंद बोराडे, दगडूसाहेब पडीले, नारायण पाटील, संजय पाटील खंडापूरकर, बाळासाहेब बीडवे, गोविंद डूरे पाटील, अनंत बारबोले, गुरूनाथ गवळी, भारत आदमाने, व अच्युत चव्हाण यांनी भेट घेऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्रात हजारो नागरिकांना व्यायामसाठी प्रेरित करणारे सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे

लातूर : आजच्या धावपळीच्या युगात सर्वच जण आपआपल्या कामात गुंतून गेले आहेत. कोणाला-कोणाकडे लक्ष देण्यास वेळच उरला नाही. त्यामुळेच माणसाचे जीवन हे मर्यादित झाले असुन माणुस हा काम, घर आणि आपला परिवार यातच गुंतून गेला आहे. माणूस हा आपल्या शरिराकडे लक्ष देण्यास विसरतो आहे. काम केल्याने पैसा मिळतो ह्या हव्यासापोटी माणूस हा पैशाच्या पाठीमागे पळत आहे. आजच्या धावपळीच्या युगात माणसाला खर्च पेलावत नाही त्यामुळे तो पैशाच्या पाठीमागे हात धुवून लागला आहे. हे जरी सत्य असले तरी माणसाने आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यायलाच हवे. याबद्दल लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी गेल्या दिड ते दोन वर्षापासून एक यंत्रणा राबविली आहे म्हणजे सकाळी ६ च्यात आत उठा नाही तर तुमच्या घरी मोर्चा. या उपक्रमामुळे आज राजुळे सरांनी कितीतरी व्यक्तींना सकाळी उठून व्यायाम करण्यासाठी प्रेरीत करीत आहेत. व्यायामाबद्दलची जनजागृती करण्याचे काम संजय राजुळे हे निस्वार्थ भावनेने करत आहेत. खरोखरच त्यांचे हे कार्य वखण्याजोगे असुन सर्वांना व्यायामाबद्दलचे महत्व पटवून देण्यासाठी रोज मित्र परिवाराला फोन करून, मॅसेज करून तसेच विविध मान्यवरांचे व्हिडीओ पोस्ट करून सर्वांनीच व्यायाम करावे याबद्दल जनजागृती करतांना दिसतात. खरोखरच आजच्या या बदलत्या जगात जिथे माणूस आपल्या शब्दावर कायम राहू शकत नाही अशा या जगात संजय राजुळे हा व्यक्ती सर्वांनी उठून व्यायाम करावे यासाठी झटत आहे. कारण संजय राजुळे हे व्यक्तीमत्व असे आहे की, प्रेमळ स्वभाव, दुसर्यांच्या अडचणीत धावुन जाणारा



व्यक्ती म्हणून संजय राजुळे यांच्याकडे पाहिले जाते. मला येथे सांगतांना आनंद होतो आहे की आज संजय राजुळे यांच्या आव्हानानंतर आज कितीतरी लोकांना पटले आहे की, व्यायाम करणे किती जरूरीचे आहे. व्यायाम करणे ही काळाची गरज असुन सर्वांनीच सकाळी लवकर उठून व्यायाम करायला हवे. व्यायामशिवाय पर्याय नाही. व्यायाम करणे ही काळाची गरज असुन ज्याला जास्त आयुष्य जगायचे असेल त्यांनी व्यायामाची सवय लावायलाच हवी. जो व्यायामाचे महत्व जाणतो तोच व्यक्ती जीवनात पुढे जावून शकतो. व्यायाम केल्याने त्याच्या अंगात एक प्रकारची प्रेरणा येतो व त्याचा दिवसही चांगला जातो. यासाठी सर्वांनीच व्यायाम करायला हवे.

# लढा स्वातंत्र्याचागाथा बलिदानाची

लातूर : प्रतिनिधी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ-२०२३' युवक महोत्सवास येथील दयानंद कला महाविद्यालयात दि. १२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. सकाळी शहरातून भव्य शोभायात्रपा काढण्यात आली. 'मराठवाडा मुक्ती संग्राम लढा स्वातंत्र्याचा गाथा बलिदनराची' या विषयावर ही शोभायात्रा काढण्यात आली होती. शोभायात्रेतील देखाव्यांनी सर्वांचे लक्षवेधले. महाविद्यालयीन युवक-युवती या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते दयानंद महाविद्यालयात विद्यापीठाचे ध्वजारोहण झाले. त्यानंतर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून शोभायात्रेस प्रारंभ झाला. कुलगुरु डॉ. भोसले यांनी हिरवी झेंडी दाखवून शोभायात्रेस सुरुवात केली. यावेळी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक प्रा. डॉ.



सूर्यप्रकाश जाधव, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांच्यासह लातूर, नांदेड, हिंगोली आणि परभणी या चार जिल्ह्यांतून आलेले कलावंत विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या धगधगत्या यज्ञकुंडात आपल्या प्राणांची आहूती देणा-या तमाम ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांना विनंम्र अभिवादन करणारे फलक शोभायात्रेच्या अग्रभागी होते. हुतात्मा स्मारक स्तंभाची प्रतिकृती, स्वामी रामानंद तीर्थ, हुतात्मा गोविंदराव पानसरे, गोविंदभाई श्राफ, वसंत राक्षसभूवनकर, दगडाबाई शेळके, अशाबाई वाघमारे, ताराबाई परांजपे यांच्यासह सर्वच स्वातंत्र्य सैनिकांची छायाचित्रे असलेला देखावा सादर करण्यात आला होता. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राणी लक्ष्मीबाई, शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व्यक्तीरेखा साकारणारे देखावे होते. आझादी का अमृत महोत्सव, मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाचेही फलक होते. घोडेस्वार विद्यार्थी या सर्वांच्या सहभागाची शोभा यात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून निघाली ती मेन रोडने लोकमान्य टिळक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून दयानंद महाविद्यालयात पोहोंचली. तेथे शोभायात्रेचा समारोप झाला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE